# देश व्यवसायात अनुकूल अर्थव्यवस्थेच्या दिशेने

## अक्षत खेतान यांची माहिती : नवीन कायदे होणार उद्योगवाढीचे भागीदार

**लोकशाही वार्ता/नागपूर**

भारत व्यवसाय, गुंतवणूक आणि उद्योगवृद्धीसाठी कायदेशीर व नियामक रचनेत व्यापक बदल करत असून, देश व्यवसाय करण्यास सर्वाधिक अनुकूल अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. व्यवसाय सुलभता, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचे पुनरुज्जीवन आणि जबाबदार भांडवलाला चालना आणि उद्योजकता व गुंतवणूक वाढीस कायदे कसे हातभार लावत आहेत, यावर एयू कॉर्पोरेट ॲडव्हायझरी ॲण्ड आणि लीगल सर्व्हिसेसचे संस्थापक अक्षत खेतान यांनी प्रकाश टाकला.

रेडिसन ब्लू हॉटेल, नागपूर येथे 'एयू कॉर्पोरेट ॲडव्हायझर आणि लीगल सर्व्हिसेस'तर्फे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी खेतान म्हणाले, आज कायदा अडथळा नाही, तर व्यवसायाचा भागीदार आहे. आम्ही पारदर्शक, पूर्वनिश्चित आणि उद्योजक कायदेशीर वातावरण निर्माण करत आहोत. खेतान यांच्या मते, पारदर्शक तरतुदी, डिजिटल फाइलिंग, साधे पालन (कॉम्प्लायन्स), कॉर्पोरेट गव्हर्नन्स आणि जागतिक गुंतवणुकीला प्रोत्साहन देणारी आधुनिक कायदेशीर चौकट भारताला अधिक स्पर्धात्मक बनवत आहे.




### एमएसएमई : भारतीय अर्थव्यवस्थेचा मजबूत पाया

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत बनत आहे. त्यासाठी एमएसएमईटी कायद्यांतर्गत देय वसुलीची कठोर अंमलबजावणी, एमएसई फॅसिलिटेशन कौन्सिल्स आणि एमएसएमई समाधान यंत्रणेचा विस्तार, आयबीसीमधील पीपीआयआरपी प्रक्रियेद्वारे पुनरुज्जीवनाला गती, एमएसईच्या क्षमता वाढीसाठी विलिनीकरण आणि अधिग्रहण व्यवहारांना प्रोत्साहन हे सर्व उपक्रम एसएसईला अधिक मजबूत, तंत्रज्ञान-सक्षम आणि जागतिक स्पर्धेस तयार करत आहेत.